# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
# (सचिवालय)

**<u>प्रस्तावना</u> :-** मौजा - हुडकेश्वर (बु.) व मौजा - नरसाळा या महसूली गावाचे क्षेत्र
**{नगर रचना विभाग}** ९७२.८२ हेक्टर एवढे असून, शासन निर्णय क्र. नामपा-२०१२/प्र.क्र.१/नवि-२६, दि. १४/०५/२०१३ अन्वये दोन्ही महसूली गावे नागपूर महानगरपालिकेच्या हद्दीत समाविष्ठ करण्यात आलेली आहेत. तसेच शासन निर्णय क्र. टिपीएस-१४१३/४०५/प्र.क्र.२१३/नवि-९, दि. १४/१०/२०१३ नूसार उक्त वाढीव क्षेत्राकरीता नागपूर महानगरपालिका नियोजन प्राधिकरण म्हणून अधिसूचित करणेत आलेले आहे.

मौजा - हुडकेश्वर (बु.) व मौजा — नरसाळा येथील मिळकतीचे ७/१२ उतारे हे शेतजमिनीच्या सर्व्हे क्रमांकानूसार आहेत. उक्त दोन्ही महसूली गावे नागपूर महानगरपालिका हद्दीमध्ये समाविष्ठ झाल्याने या दोन्ही महसूली गावातील मिळकतींचे मालकी हक्काबाबत नगर भुमापन नकाशे तयार करून त्यानूसार आखिव पत्रिका तयार करणे आवश्यक झालेले आहे. त्यानुषंगाने सदर कामाकरीता आवश्यक निधी रू. ५,५०,३२,८००/- आवश्यक असल्याचे जिल्हा अधिक्षक, भूमी अभिलेख, नागपूर यांनी संदर्भिय पत्र क्र. २ अन्वये नगर भुमापन करणेचा ठराव पारीत करून एकुण खर्चाच्या ७५% रक्कमेचा भरणा करणे व उर्वरीत रक्कमेचा १ वर्षात भरणा करण्याबाबत हमीपत्र सादर करणे व त्यास शासनाकडून मान्यता प्राप्त करणे असे नागपूर महानगरपालिकेस कळविले होते. त्या दरम्यान महानगरपालिकेकडील आर्थीक तरतूदीचा विचार करता, तेव्हा त्याबाबत कोणतीही कार्यवाही करणेत आलेली नाही.

महानगरपालिका क्षेत्रातील वेगाने वाढणारे नागरीकरण व त्यानुषंगाने जमिनीच्या बाबतीत उद्भवणाऱ्या समस्या विचारात घेता, नागपूर महानगरपालिका हद्दीमध्ये सन-२०१३ ला समाविष्ठ झालेल्या मौजा - हुडकेश्वर (बु.) व मौजा — नरसाळा या दोन महसूली गावाचे नगर भुमापन नकाशे व मिळकतीच्या आखिव पत्रिका तयार करणे अत्यंत गरजेचे आहे. तेव्हा सदर उक्त दोन महसूली गावांचे नगर भुमापन नकाशे व आखिव पत्रिका तयार करणेकामी महानगरपालिकेचा प्रशासकीय मान्यता देणे तसेच उक्त नगर भुमापन नकाशे व आखिवपत्रिका तयार करणेकरीता लागणारा खर्च हा शासन नगर विकास विभागाकडील निर्णय क्र. जिवायो-२०१०/प्र.क्र.२६/नवि-४, दि. ०८/०२/२०११ च्या महानगरपालिका / नगरपालिका / नगरपंचायती क्षेत्रामध्ये नागरी दलितेत्तर वस्ती सुधारणा योजनेची अंमलबजावणी करणेसाठी विहीत मार्गदर्शक तत्वातील महानगरपालिका क्षेत्रातील नागरी दलितेत्तर वस्त्यांचे सर्व्हेक्षण करणेची बाब विचारात घेता, सदर सर्व्हेक्षण करणे, नगर भुमापन नकाशे तयार करणे व आखिव पत्रिका तयार करणेकामी उक्त शासन निर्णयानूसार निधी मंजूरीचा प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी, नागपूर यांचेकडे सादर करणे.

मौजा - हुडकेश्वर (बु.) व मौजा — नरसाळा या दोन महसूली गाव नागपूर महानगरपालिकेच्या हद्दीत समाविष्ठ झाल्यामुळे सदर गावांचे नगर भुमापन नकाशे व आखिवपत्रिका तयार करणेकरीताची मान्यता व आवश्यक रू. ५,५०,३२,८००/- निधी महानगरपालिका क्षेत्रामध्ये नागरी दलितेत्तर वस्ती सूधारणा योजने अंतर्गत मागणी करणेकरीता मान्यता प्रदान करणे.

(सविस्तर टिपणी नस्तीत उपलब्ध आहे)

## <u>पारीत ठराव</u>

**ठराव क्रमांक :- 52/मनपा/प्रशासक** **दिनांक :- 28/02/2024**

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसारउपसंचालक, नगर रचना विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार मौजा - हुडकेश्वर (बु.) व मौजा - नरसाळा या महसूली गावाचे क्षेत्र ९७२.८२ हेक्टर एवढे असून, शासन निर्णय क्र.

नामपा-२०१२/प्र.क्र.१/नवि-२६, दि. १४/०५/२०१३ अन्वये दोन्ही महसूली गावे नागपूर महानगरपालिकेच्या हद्दीत समाविष्ठ करण्यात आलेली आहेत. तसेच शासन निर्णय क्र. टिपीएस-१४१३/४०५/प्र.क्र.२१३/नवि-९, दि. १४/१०/२०१३ नूसार उक्त वाढीव क्षेत्राकरीता नागपूर महानगरपालिका नियोजन प्राधिकरण म्हणून अधिसूचित करणेत आलेले आहे.

मौजा - हुडकेश्वर (बु.) व मौजा – नरसाळा येथील मिळकतीचे ७/१२ उतारे हे शेतजमिनीच्या सर्व्हे क्रमांकानूसार आहेत. उक्त दोन्ही महसूली गावे नागपूर महानगरपालिका हद्दीमध्ये समाविष्ठ झाल्याने या दोन्ही महसूली गावातील मिळकतींचे मालकी हक्काबाबत नगर भुमापन नकाशे तयार करून त्यानूसार आखिव पत्रिका तयार करणे आवश्यक झालेले आहे. त्यानुषंगाने सदर कामाकरीता आवश्यक निधी रू. ५,५०,३२,८००/- आवश्यक असल्याचे जिल्हा अधिक्षक, भूमी अभिलेख, नागपूर यांनी संदर्भिय पत्र क्र. २ अन्वये नगर भुमापन करणेचा ठराव पारीत करून एकुण खर्चाच्या ७५% रक्कमेचा भरणा करणे व उर्वरीत रक्कमेचा १ वर्षात भरणा करण्याबाबत हमीपत्र सादर करणे व त्यास शासनाकडून मान्यता प्राप्त करणे असे नागपूर महानगरपालिकेस कळविले होते. त्या दरम्यान महानगरपालिकेकडील आर्थीक तरतूदीचा विचार करता, तेव्हा त्याबाबत कोणतीही कार्यवाही करणेत आलेली नाही.

महानगरपालिका क्षेत्रातील वेगाने वाढणारे नागरीकरण व त्यानुषंगाने जमिनीच्या बाबतीत उद्भवणाऱ्या समस्या विचारात घेता, नागपूर महानगरपालिका हद्दीमध्ये सन-२०१३ ला समाविष्ठ झालेल्या मौजा - हुडकेश्वर (बु.) व मौजा – नरसाळा या दोन महसूली गावाचे नगर भुमापन नकाशे व मिळकतीच्या आखिव पत्रिका तयार करणे अत्यंत गरजेचे आहे. तेव्हा सदर उक्त दोन महसूली गावांचे नगर भुमापन नकाशे व आखिव पत्रिका तयार करणेकामी महानगरपालिकेचा प्रशासकीय मान्यता देणे तसेच उक्त नगर भुमापन नकाशे व आखिवपत्रिका तयार करणेकरीता लागणारा खर्च हा शासन नगर विकास विभागाकडील निर्णय क्र. जिवायो-२०१०/प्र.क्र.२६/नवि-४, दि. ०८/०२/२०११ च्या महानगरपालिका / नगरपालिका / नगरपंचायती क्षेत्रामध्ये नागरी दलितेत्तर वस्ती सुधारणा योजनेची अंमलबजावणी करणेसाठी विहीत मार्गदर्शक तत्वातील महानगरपालिका क्षेत्रातील नागरी दलितेत्तर वस्त्यांचे सर्व्हेक्षण करणेची बाब विचारात घेता, सदर सर्व्हेक्षण करणे, नगर भुमापन नकाशे तयार करणे व आखिव पत्रिका तयार करणेकामी उक्त शासन निर्णयानूसार निधी मंजूरीचा प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी, नागपूर यांचेकडे सादर करणे.

मौजा - हुडकेश्वर (बु.) व मौजा – नरसाळा या दोन महसूली गाव नागपूर महानगरपालिकेच्या हद्दीत समाविष्ठ झाल्यामुळे सदर गावांचे नगर भुमापन नकाशे व आखिवपत्रिका तयार करणेकरीताची मान्यता व आवश्यक रू. ५,५०,३२,८००/- निधी महानगरपालिका क्षेत्रामध्ये नागरी दलितेत्तर वस्ती सूधारणा योजने अंतर्गत मागणी करण्याच्या प्रस्तावास मा. प्रशासक यांनी मंजुरी प्रदान केली.